श्री. दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे,

दादापाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालय

आदिनाथनगर, ता.पाथर्डी, जि. अहमदनगर

सहकारमहर्षी स्व. दादापाटील राजळे स्मृती व्याख्यानमाला

श्री. दादापाटील राजळे शिक्षण संस्था, आदिनाथनगर, ता.पाथर्डी, जि. अहमदनगर

महाराष्ट्राच्या भूमित अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुका हा सतत अवर्षणग्रस्त तसेच डोंगराळ, उजाड माळरानाचा म्हणून ओळखला जातो. या भागात कासार पिंपळगाव येथे शेतकरी कुटूंबात जन्मलेल्या मा.दादापाटील राजळे यांनी केलेल्या कार्यामुळे हा परिसर समृध्द झालेला आहे. त्यांनी प्राप्त परिस्थितीशी संघर्ष केला. शेतकरी, कामगार, कष्टकरी गोरगरीबांच्या हितासाठी त्यांनी समाजकार्यात स्वत:ला वाहून घेतले. तालुक्याच्या विकासासाठी श्री वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना उभा केला आज तो प्रगतीपथावर आहे. परिसराचा विकास आर्थिक दृष्ट्या होणे जितके महत्त्वाचे तितकेच शैक्षणिक, सामाजिक प्रगतीला त्यांनी महत्त्व दिले.

पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीत महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचाराचा वारसा प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी सहकार महर्षी स्व.दादापाटील राजळे यांनी अनेक शिक्षण संस्थांना मदत केली. तालुक्याच्या विकासाठी १९९१ साली शिक्षण संस्थेची स्थापना केली, शिक्षणातूनच समाज प्रगतीकडे जाऊ शकतो. हे त्यांना अनुभवातून पटले. त्यासाठी परिसरातील गोरगरीबांच्या शेतकरी कामगारांच्या मुलामुलींना चांगले शिक्षण मिळावे या उदात्त हेतूने कला व विज्ञान महाविद्यालय सुरु केले. शै. वर्ष २०२२-२३ या वर्षात महाविद्यालय ३२ व्या वर्षात वाटचाल करत आहे. या महाविद्यालयाची शैक्षणिक वर्षे २०२१-२२ ची विद्यार्थी संख्या १६६९ असुन त्यामध्ये १०७५ विद्यार्थी व ५९४ विद्यार्थीनी आहेत. २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासुन संगणकशास्त्र ही पदवीस्तरावरील विज्ञानशाखा व २०१२-१३ पासून पदव्यूत्तर स्तरावर एम.ए. मराठी हे वर्ग सुरु करण्यात आले आहेत. शैक्षणिक वर्षे २०१३-१४ पासुन पदव्युत्तर स्तरावर एम.ए. इग्रंजी, एम.एस्सी रसायनशास्त्र (अनालेटीकल) २०१४-१५ पासून बी.एस्सी पदवी स्तरावर प्राणिशास्त्र हा विषय विशेष स्तरावर कार्यरत आहेत. शैक्षणिक वर्षे २०१८-१९ या वर्षात पदवी स्तरावर वाणिज्य शाखा, पदव्यूत्तर स्तरावर एम एस्सी रसायणशास्त्र (इनऑरगेनिक) एम.ए. अर्थशास्त्र हे विषय व आमदार राजीव राजळे व्होकेशनल ट्रेनिंग सेटर नव्याने कार्यरत आहेत.

महाविद्यालयाची भव्य इमारत, ग्रंथालय, जिमखाना, आ.राजीव राजळे क्रिडा संकुल, मुलींचे वसतीगृह, विज्ञान व संगणक विषयांच्या सुसज्ज प्रयोगशाळा, जनसेट, सोलर पॉवर सिस्टीम, सी.सी.टिव्ही, कॅमेरे, वृक्षांनी नटलेला परिसर, ३२ लाख लिटर पाणी साठवण क्षमतेचे शेततळे, भव्य क्रिडागंण असुन संगणक प्रशिक्षण, कमवा व शिका योजना, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन इ. उपक्रम कार्यरत आहेत. नॅक पुर्नमूल्याकंन मध्ये 'ब' दर्जा मिळालेला आहे. २००२ साली संस्थेने महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषितंत्र विद्यालय सुरु केले २०१२-१३ पासून ते डॉ. अण्णासाहेब शिंदे ॲग्रीकल्चर पॉलिटेक्निक नावाने कार्यरत आहेत एकंदर विद्यार्थ्यांना सर्वागींण शिक्षण व मार्गदर्शन या संस्थेतून दिले जाते. संस्थेचे अध्यक्ष मा.आ.आप्पासाहेब राजळे पाटील, आमदार मोनिकाताई राजीव राजळे, विश्वस्त मा.राहुल राजळे, मार्गदर्शक मा.शिवाजीराव राजळे, सचिव मा.जे.आर.पवार व सर्व विश्वस्त यांच्या मार्गदर्शनाने श्री. दादापाटील राजळे शिक्षण संस्था कार्यरत असून संख्यात्मक व गुणात्मक प्रगतीकडे झेपावत आहे.

सहकारमहर्षी स्व. दादापाटील राजळे (भाऊ) स्मृतीस्थळ

सहकारमहर्षी स्व. दादापाटील राजळे स्मृती व्याख्यानमाला

"शिक्षणातून माणूस केवळ सुशिक्षीतच नव्हे, तर सुसंस्कारीत आणि विचारी झाला पाहिजे." या विचाराने श्री वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना व शिक्षण संस्थेचे संस्थापक सहकार महर्षि स्व.दादापाटील राजळे यांनी शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात कार्य केले आहे. आपल्या ८४ वर्षाच्या आयुष्यात भारतीय स्वातंत्र्य चळवळ, डावी चळवळ, सत्यशोधक चळवळ, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, पंचायतराज व्यवस्था आणि सहकारी चळवळीत सक्रिय भाग घेवून पाथर्डी तालुक्याच्या विकासात त्यांनी मौलिक कार्य केलेले आहे. या भागातील शेतकरी, कष्टकरी, कामगार, गोरगरीबांच्या मुला मुलींना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी १९९१ साली शिक्षण संस्था स्थापन करुन विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय व २००२ साली डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषितंत्र विद्यालय सुरु केले. पाथर्डी सारख्या दुर्गम भागात या संस्थेच्या रुपाने मा.दादापाटील राजळे यांनी ज्ञानयज्ञ कार्यरत ठेवलेला आहे. आयुष्याच्या शेवटपर्यंत ३० जून २००६ पर्यंत ते समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत होते.

आदरणीय स्व.दादापाटील राजळे (भाऊ) यांच्या विचार कार्याची, संस्काराची स्मृती चिरंतन तेवत राहावी. आधुनिक काळात, स्पर्धेच्या युगात विद्यार्थी सक्षमपणे उभा रहावा त्यांच्या विचारांना दिशा मिळावी या उदात्त हेतुने शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, लोकनेते मा.आ.आप्पासाहेब राजळे पा. यांच्या प्रेरणेने १८ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट २००६ या काळात स्व. दादापाटील राजळे स्मृती व्याख्यानमाला सुरु करण्यात आली या व्याख्यानमालेत आजपर्यंत महाराष्ट्रातील विविध भागातील व क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शक विचारवंतांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत.

ऑगस्ट २०१७, वर्ष-१२

शुक्रवार दि. १८/०८/२०१७

मा. प्राचार्य नंदकुमार निकम

(मा. अध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्राचार्य संघटना)

उच्च शिक्षणातील आव्हाने

शनिवार दि. १९/०८/२०१७

मा. राजेंद्र राऊत

प्रशिक्षक, आर्ट ऑफ लिव्हिंग, बारामती

व्यक्तिमत्त्व विकास

रविवार दि. २०/०८/२०१७

मा. संदिप रक्ताटे

जैवतंत्रज्ञ, औरंगाबाद

उद्योग व व्यवसायातील संधी

ऑगस्ट २०१७, वर्ष-१२

सोमवार दि. २१/०८/२०१७

श्रीमती अंजली देवकर

आंतरराष्ट्रीय कुस्तीपट्टु, अहमदनगर

स्वसंरक्षण, प्रशिक्षण

मंगळवार दि. २२/०८/२०१७

मा. पोपटराव पवार

कार्याध्यक्ष आदर्शगाव संकल्प व प्रकल्प समिती, महाराष्ट्र राज्य

आदर्शगाव संकल्प

मंगळवार दि. २२/०८/२०१७

स्व.सौ. चंद्रभागाबाई दादापाटील राजळे सर्व सेवाभावी संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी-शिक्षकांचा सत्कार

ऑगस्ट २०१८, वर्ष-१३

शनिवार दि. १८/०८/२०१८

मा. प्राचार्य, डॉ. के. सी मोहिते

सी. टी. बोरा कॉलेज, शिरुर, जि. पुणे

उच्च शिक्षणातील संशोधनाचे महत्त्व

रविवार दि. १९/०८/२०१८

मा. भास्करराव पेरे पाटील

सरपंच, आदर्शगाव पाटोदा, जि. औरंगाबाद

ग्रामीण विकास का व कसा?

सोमवार दि. २०/०८/२०१८

मा. मनोहर भोळे

लेखक, संचालक- युनिक अकॅडमी, पुणे

स्पर्धा परीक्षेचे महत्त्व

ऑगस्ट २०१८, वर्ष-१३

मंगळवार दि. २१/०८/२०१८

मा. डॉ. बाबासाहेब गोरे,

कृषीशास्त्रज्ञ, राहता, जि. अहमदनगर

कृषी उद्योगातील संधी

बुधवार दि. २२/०८/२०१८

प्रा. डॉ. गिरिश कुलकर्णी

संचालक, स्नेहालय, अहमदनगर

ग्रामीण विकासात सहकाराचे योगदान

बुधवार दि. २२/०८/२०१८

स्व.सौ. चंद्रभागाबाई दादापाटील राजळे सर्व सेवाभावी संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी-शिक्षकांचा सत्कार

ऑगस्ट २०१९, वर्ष-१४

मंगळवार दि. २०/०८/२०१९

श्रीमती राहिबाई पोपरे

बीजमाता,कोंभाळणे, अकोले

अन्न आणि पोषण सुरक्षेसाठी कृषी जैव विविधतेचे महत्त्व

बुधवार दि. २१/०८/२०१९

मा. श्री. अनिल बोकिल

अर्थतज्ञ, चेअरमन, अर्थक्रांती प्रतिष्ठाण, पुणे

भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरुप

गुरुवार दि. २२/०८/२०१९

मा. श्री. इंद्रजीत देशमुख

मा. आय. ए. एस. अधिकारी

स्पर्धा परीक्षेचे महत्त्व

ऑगस्ट २०२०, वर्ष-१५

गुरुवार दि. २०/०८/२०२०

मा. श्री. एन. बी धुमाळ

उद्योजक, अहमदनगर

युवा उद्योजगता

शुक्रवार दि. २१/०८/२०२०

प्रा. पियुष पहाडे

एच. व्ही. देसाई कॉलेज, पुणे

उच्च शिक्षणातील आव्हाने

शनिवार दि. २२/०८/२०२०

मा. श्री. प्रविण कोल्हे

अधिक्षक अभियंता, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे

स्पर्धा परीक्षा

ऑगस्ट २०२१, वर्ष-१६

रविवार दि. २२/०८/२०२१

स्मृती व्याख्यानमाला उद्घाटन समारंभ प्रसंगी

प्रा. डॉ. पंडीत विद्यासागर व इतर मान्यवर

रविवार दि. २२/०८/२०२१

प्रा. डॉ. पंडीत विद्यासागर

मा. कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

नवीन शैक्षणिक धोरण संशोधक, शास्त्रज्ञ व साहित्यीक

रविवार दि. २२/०८/२०२१

प्रा. डॉ. पंडीत विद्यासागर, संस्थेचे अध्यक्ष मा. आ. आप्पासाहेब राजळे(काका) व उपाध्यक्ष मा. श्री. रामकिसन काकडे

ऑगस्ट २०२२, वर्ष-१७

शनिवार दि. २०/०८/२०२२

मा. प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे

ज्येष्ठ लेखक, साहित्यिक, वक्ते, सातारा

जीवन त्यांना कळले हो.

रविवार दि. २१/०८/२०२२

मा. श्री. यशवंत शितोळे

संस्थापक अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, कोल्हापुर

करिअर कट्टा-यशस्वी जीवनाचा मंत्र

सोमवार दि. २२/०८/२०२२

भागवताचार्य अशोकानंद कर्डिले महाराज,

चिचोंडी पाटील

ऑगस्ट २०२२, वर्ष-१७

सोमवार दि. २२/०८/२०२२

प्रा. एकनाथ खांदवे

मा. प्राचार्य, श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा

रविवार दि. २२/०८/२०२२

डॉ. तानाजी राऊ पाटील

संत साहित्यातील सामाजिकता या ग्रंथासाठी

सहकार महर्षी स्व. दादापाटील राजळे राज्यस्तरीय वाङ्:मयनिर्मिती पुरस्कार-२०२१-२२

रविवार दि. २२/०८/२०२२

स्व.सौ. चंद्रभागाबाई दादापाटील राजळे सर्व सेवाभावी संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी-शिक्षकांचा सत्कार

ऑगस्ट २०२३, वर्ष-१८

रविवार दि. २० ऑगस्ट २०२३

स्मृती व्याख्यानमाला उद्घाटन समारंभ प्रसंगी

मा. डॉ. संज्योत वैद्य आणि आमदार. मोनिकाताई राजळे

रविवार दि. २० ऑगस्ट २०२३

मा. डॉ. संज्योत वैद्य

संचालक, प्राचार्य, स्ट्राबेरी इंटरनॅशनल स्कूल, संगमनेर

आनंदाचे डोही आनंद तरंग

सोमवार दि. २१ ऑगस्ट २०२३

मा. श्री. यश वेलणकर

मुंबई

यशस्वी जीवनासाठी आवश्यक दृष्टी

ऑगस्ट २०२२, वर्ष-१७

मंगळवार दि. २२ ऑगस्ट २०२३

स्मृती व्याख्यानमाला समारोप प्रसंगी

मा. प्राचार्य डॉ. अरुण अडसूळ व संस्थेचे अध्यक्ष मा. आ. आप्पासाहेब राजळे(काका)

मंगळवार दि. २२ ऑगस्ट २०२३

मा. प्राचार्य डॉ. अरुण अडसूळ

मा. सदस्य महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मा, कुलगुरु, अध्यक्ष, भारतीय शिक्षण संस्था, पुणे

करिअरच्या वाटा निवडतांना

मंगळवार दि. २२ ऑगस्ट २०२३

स्व.सौ. चंद्रभागाबाई दादापाटील राजळे सर्व सेवाभावी संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी-शिक्षकांचा सत्कारप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे. टेमकर यांचा सत्कार

वर्तमानपत्रातील प्रसिध्दी

सार्वमत

स्व. राजळे स्मृती व्याख्यानमाला २० पासून

पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)- भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव तसेच सहकारमहर्षी स्व.दादापाटील राजळे यांच्या १०० व्या जयंती निमित्त दादापाटील राजळे महाविद्यालयात २० ते २२ ऑगस्ट २०२२ या कालावधीत स्व.दादा पाटील राजळे स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती माजी जि.प.सदस्य तथा वृद्धेश्वरचे संचालक राहुल राजळे यांनी दिली.

शनिवार (दि.२०) सकाळी सातारा येथील ज्येष्ठ साहित्यीक प्राचार्य डॉ.यशवंत पाटणे यांच्या व्याख्यानाने व्याख्यान मालेचे अध्यक्षस्थानी आमदार मोनिका राजळे तर वृध्देश्वरचे ज्येष्ठ संचालक सुभाष ताठे हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. या व्याख्यानमालेत रविवारी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र कोल्हापूरचे संचालक यशवंत शितोळे हे 'करियर कट्टा यशस्वी जीवनाचा मंत्र' या विषयावर प्रबोधन करणार आहेत.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वृध्देश्वरचे ज्येष्ठ संचालक उद्धवराव वाघ तर श्रीगोंदा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एकनाथ खांदवे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. व्याख्यानमालेचा समारोप सोमवार दि.२२ ऑगस्ट रोजी सकाळी

पुढारी

जगण्यासाठी ज्ञानासह विचार गरजेचे

प्राचार्य डॉ.यशवंत पाटणे; स्व.दादापाटील राजळे स्मृती व्याख्यानमाला

पाथर्डी तालुका : पुढारी वृत्तसेवा

जीवन जगण्यासाठी आवश्यकता पैसे लागतात. मात्र, समाधान आणि समाजाने जगण्यासाठी आपल्याकडे ज्ञानाबरोबर विचार गरजेचे आहेत. जीवन पार्डिण्यासाठी चांगले वाचावे लागते आणि चांगले वेचावे लागते, असे प्रतिपादन सातारा येथील ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ.यशवंत पाटणे यांनी केले.

कासार पिंपळगाव येथील दादापाटील राजळे महाविद्यालयाच्या सहकारमहर्षी स्व.दादापाटील राजळे यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त आयोजित स्मृती व्याख्यानमालेचे उद्घाटन डॉ.पाटणे यांच्या हस्ते झाले. त्याचेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार मोनिका राजळे होत्या. वृध्देश्वरचे उपाध्यक्ष रामकिसन काकडे, संचालक उध्दव वाघ, सुभाष ताठे, कुशिनाथ बर्डे, श्रीकांत मिसाळ,महादेव जावभाये, माजी सभापती बाळासाहेब अकोलकर, मिझा मणियार, काकासाहेब शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

पाथर्डी : व्याख्यानमालेचे उद्घाटन करताना डॉ.यशवंत पाटणे, आ. मोनिका राजळे आदी.(छाया : अमोल कांकरिया)

'जीवन त्यांना कळले हो' या विषयावर बोलताना डॉ.पाटणे म्हणाले, स्व.दादापाटील राजळे चालते बोलते लोकपीठ होते. त्यांच्यावर महात्मा गांधी, पंडित नेहरू, वसंतदादा यांच्या विचाराचा प्रभाव होता. ते महाराष्ट्रातील एकमेव सहकारमहर्षी आहेत ज्यांनी कारखान्याअगोदर वाचनालय सुरू केलं. पाथर्डी सारख्या दुष्काळी तालुक्यातील माळरानावर त्यांनी साखर कारखाना, शिक्षण संस्था, शेती पतसारख्या क्षेत्रात क्रांती केली. मोनिका राजळे यांच्या नेतृत्वात गुणवत्ता असल्याने त्या दुसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आल्या. असे मोलाचे विचार देत डॉ.पाटणे यांनी उपस्थितांना तासभर मंत्रमुग्ध करून खिळवून ठेवले.

याचेळी स्व.दादा पाटील राजळे यांचे स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळातील काही निवडक पत्रांचे प्रदर्शन यावेळी कार्यक्रमाच्याठी ठेवण्यात आले होते. प्रास्ताविक प्राचार्य राजश्री टेमकर यांनी केले. प्रा.राजेंद्र इंगळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. निर्मला काकडे यांनी आभार मानले.

Ahmednagar Edition
Aug 21, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

पुण्य नगरी

'दादापाटील राजळे हे चालते बोलते लोकपीठ'

कासार पिंपळगाव : नाफसंस्कृत निर्यात सहकारसाठी अन्न लागते, पण सम्मानाने अन्नाबरोबर अन्नपाणी विचारांची गरज असते, मानवी जीवनाची सार्थकता ही आयुष्यभर उपस्थित्य विचार मूल्यांवर अवलंबून असते. सामान्य माणूस आणि लोकशाही मूल्ये हाच दादापाटील राजळे यांच्या विकासकार्याचा केंद्रबिंदू होता. दादापाटील राजळे हे चालते बोलते लोकपीठ होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक, साहित्यिक प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे यांनी केले.

पाथर्डी तालुक्यातील आदिनाथनगर येथील दादापाटील राजळे महाविद्यालयात स्व. दादापाटील राजळे यांच्या संभाव्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानमालेत बोलत होते. व्याख्यानमालेचे उद्घाटन ज्येष्ठ लेखक, साहित्यिक प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे (सातारा), यांच्या हस्ते झाले. 'जीवन त्यांना कळले हो' या विषयावरील व्याख्यानात डॉ. पाटणे यांनी, स्व. दादापाटील राजळे म्हणजे व्याख्यानमाला ही एक कर्मयोगाच्या विचारांचा उत्सव आहे. माणसांना निर्यात सहकारसाठी अन्न लागते, पण सम्मानाने आणि समाधानाने जगण्यासाठी विचारांची गरज असते. मानवी जीवनाची सार्थकता ही आयुष्यभर उपस्थित्या विचार मूल्यांवर अवलंबून असते. सामान्य माणूस आणि लोकशाही मूल्ये हाच दादापाटील राजळे यांच्या विकासकार्याचा केंद्रबिंदू होता. सामाजिक न्यायासाठी लढणे हा त्यांचा पिंड होता आणि सत्ता हे त्यांचा स्थायीभाव होता. दादापाटील राजळे यांचे जीवन ही संघर्ष गाथा आहे. जीवन जरूर असतील माणसे सत्ताधारी घर बांधतात; परंतु जनसामान्य माणसांच्या मनात घर बांधता आले पाहिजे. स्व. भाऊंचे नेतृत्व हे दूरदृष्टीने नेतृत्व होते. त्यांनी मानवनिर्मित अज्ञानाचा आणि दारिद्र्याचा अंधकार दूर करण्यासाठी श्री वृद्धेश्वर सहकारी साखर व्यवस्थापन आणि ज्ञानमंदिरांची उभारणी केली. आजच्या युवा पिढीत अतिरेकी फेसबुक वाढत चाललेला आहे. त्यासाठी शिक्षणाबरोबरच शारीरिक शक्तीप्रमाणे माणसांत येणे गरजेचे आहे. छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत बाबाजी महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा वारसा स्व. भाऊंनी पुढे चालवला. माणसाला मूल्य असणे; परंतु माणसाने कर्म अमर असते. माणसाने निसर्गात, ग्रंथात व माणसांत रमणे पाहिजे. एका राजीनुन संस्कृती निर्माण होत नाही, असे विचार प्राचार्य सदाशिव पाटणे यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजभर टेकर यांनी केले. त्यांनी स्व. दादापाटील राजळे स्मृती व्याख्यानमालेचा आढावा पेडन प्रमुख वक्तृत्वांचा परिचय करून दिला. व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान अ. मोनिकाताई राजीव राजळे यांनी भूषवले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी व्याख्यानमालेच्या आयोजनसंदर्भात सर्वांचे अभिनंदन केले व सर्व विद्यार्थ्यांना व व्याख्यानमालेचा लाभ घेण्याचे आवाहन केले. व्याख्यानपूर्वीच्या संत्रेचे उपाध्यक्ष राकिसन बा. काकडे, ज्येष्ठ संचालक उद्धवराव वा. वाघ, राहुल राजळे, कुशिनाथ बर्डे, सुभाषराव ताठे, पांडुरंग कलोटे यर, रामचंद्र मारके, एकनाथ लवांडे, श्रीकांत मिसाळ, जे. आर.

(छाया : अमोलनारस्ते)

सार्वमत

आनंदी राहण्याची कला आली त्यांनाच जीवन कळले

डॉ. पाटणे : स्व. राजळे व्याख्यान मालेस प्रारंभ

पाथर्डी (तालुका प्रतिनिधी) - सिमेंटने कोकीळेला फक्त कंठ दिला, मोराला फक्त पिसारा दिला तर वाघाला फक्त पंजा दिला. माझ, माणसाला आनंदी राहण्यासाठी कला, विचार करायला बुध्दी व सेवा करायला हात दिले. हे ज्यांना समजले त्यांनाच जीवन कळले असे प्रतिपादन सातारा येथील ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे यांनी केले.

कासार पिंपळगाव येथील दादा पाटीलराजळेमहाविद्यालयाच्यावतीने भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व सहकारमहर्षी स्व. दादापाटील राजळे यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त आयोजित तीन दिवसीय व्याख्यानमालेचे उद्घाटन डॉ.पाटणे यांच्या हस्ते झाले. त्याचेळी पहिले पुष्प गुंफताना 'जीवन त्यांना कळले हो' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आ. मोनिका राजळे होत्या. याचेळी वृध्देश्वरचे उपाध्यक्ष रामकिसन काकडे, संचालक उध्दव वाघ, सुभाष ताठे, कुशिनाथ बर्डे, श्रीकांत मिसाळ, महादेव जावभाये, माजी सभापती बाळासाहेब अकोलकर, मिझा मणियर, काकासाहेब शिंदे, सुनील ओव्हळ, अनिल बोडदे, सुनील पुंड, प्रा. रमेश कांटे, आर. वाघ.मारके, जे.आर.पवार, भास्कर गोरे, आर.जे. महाजन, उद्धव माने विद्यार्थ्यांसह, शिक्षक, कर्मचारी व पालकांची प्रामाण्य याचेळी उपस्थित होते. डॉ. पाटणे म्हणाले, स्व. दादापाटील राजळे चालते बोलते लोकपीठ होते. त्यांच्यावर महात्मा गांधी, पंडित नेहरू, वसंतदादा यांच्या विचाराचा प्रभाव होता. ते महाराष्ट्रातील एकमेव सहकारमहर्षी आहेत, ज्यांनी कारखान्याअगोदर वाचनालय सुरू केले. स्व.दादापाटील यांनी अनेक खाणाच्या मजल काबयची घरे बांधली. डॉ.पाटणे यांनी उपस्थितांना तासभर मंत्रमुग्ध करून खिळवून ठेवले. याचेळी स्व. दादा पाटील राजळे यांचे स्वातंत्र्या लेतच्या काळातील काही निवडक पत्रांचे प्रदर्शन कार्यक्रमासाठी ठेवण्यात आले होत. प्रास्ताविक प्राचार्य राजभर टेमकर, सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र इंगळे यांनी तर आभार प्रा. निर्मला काकडे यांनी मानले.

आ. राजळे नामदार व्हाव्यात!

- आ. मोनिकताईच्या नेतृत्वात दुसऱ्यांदा आहे, यामुळे त्या सलग दुसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आल्या. सर्वांना प्रेम देऊन विश्वास संपादन करून एखाद मंत्रि काम पण केले. दादूजी मोनिकताई राजळे अमृतमहोत्सवी वर्षात नामदार होऊ दे अशी देवांकडे प्रार्थना करू असे डॉ. पाटणे म्हणताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.

सार्वमत

मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम

यशवंत शितोळे; राजळे स्मृती व्याख्यानमालेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

पाथर्डी तालुका : पुढारी वृत्तसेवा

मोबाईलचा चांगला वापर करून विद्यार्थ्यांनी त्यातून स्मार्ट ज्ञान घेऊन शिक्षणासाठी उपयोग करावा. आपण सोळा ते अठरा तास मोबाईलचा वापर करतो. या वापरातून वाईट गोष्टींकडे आपण जास्त केंद्रित होतो. त्यामुळे आपल्या करिअरवर त्याचा नकीच वाईट परिणाम होत आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे संस्थापक अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी केले.

सहकार महर्षी स्व.दादापाटील राजळे यांच्या शंभरव्या जयंतीनिमित्त राजळे महाविद्यालयाच्या वतीने आयोजित तीन दिवसीय व्याख्यानमाले प्रसंगी 'करिअर कट्टा यशस्वी जीवनाचा मंत्र' या विषयावर शितोळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. अध्यक्षस्थानी वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक उद्धव वाघ होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपाध्यक्ष रामकिसन काकडे, पवार, प्राचार्य मच्छिंद्र फसले, भास्कर गोरे, आर. जे. महाजन, सुनील पुंड, रामदास म्हस्के, प्राचार्य राजभर टेमकर, पोपट आंधळे आदी उपस्थित होते.

शितोळे म्हणाले की, आपल्या आयुष्य त्याच्या स्मार्टपणे वापर करत नाही. करिअर घडविण्यासाठी, पुढे जाण्यासाठी त्यातच्या चांगले ज्ञान घेऊन त्याच्या माध्यमाद्वार ज्ञान घेतले पाहिजे. स्पर्धा परीक्षा करताना त्याहा यश येईलच असे नसते. त्यामाडी जीवनात दुसरा मार्ग शोधून देवणे व त्यात करिअर करणे हा सुद्धा विचार विद्यार्थ्यांनी केला पाहिजे. सोशल मीडियाच्या माध्यमातून करिअर कट्टाद्वारून पाच हजार कॉलेज सहभागी झालेले आहेत. सुमारे ८० हजार विद्यार्थ्यांशी संवाद झाला आहे. या स्पर्धा परीक्षा व व्यवसायाच्या गोष्टीबाबत तज्ञांचे मार्गदर्शन होते. प्रस्ताविक प्रा. डॉ. किशोर गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शामराव गरड यांनी केले. आभार प्रा.

पाथर्डी : विद्यार्थ्यांना करिअर कट्टा यशस्वी जीवनाचा मंत्र या विषयावर मार्गदर्शन करताना यशवंत शितोळे.(छाया अमोल कांकरिया)

सकाळ

दादा पाटील राजळेंनी क्रांती घडवली

अशोक महाराज कर्डिले, साहित्य पुरस्कारांचे वितरण

सकाळ वृत्तसेवा

पाथर्डी, ता. २२ : आपल्या अंगी असलेल्या जिद्दीच्या बळावर (कै.) दादा पाटील राजळे यांनी सहकार, शिक्षण या शेती क्षेत्रात क्रांती घडवली, असे मत भागवताचार्य अशोक महाराज कर्डिले यांनी व्यक्त केले. तालुक्यातील कासार पिंपळगाव येथील दादा पाटील राजळे महाविद्यालयाच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व राजळे यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानमालेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

या वेळी राहुल राजळे, प्रा. डॉ. तानाजी पाटील, प्रा. डॉ. एकनाथ खांदवे, रामकिसन काकडे,उद्धव वाघ, सुभाष ताठे, जे. आर. पवार, कुशिनाथ बर्डे, प्राचार्य राजभर टेमकर, कैलाश मिसाळ, बाबासाहेब किलबिले, नारायण काकडे, शरद अकोलकर, शेषराव ढाकणे, श्यामसुंदर राजळे, पोपटराव आंधळे, पुरुषोत्तम आठरे, धनंजय बडे, आदी उपस्थित होते.

(कै.) राजळे उत्कृष्ट संत साहित्य पुरस्कार डॉ. पाटील यांना, तर प्रगतिशील शेतकरी म्हणून भिवसेन हाडके, आजिनाथ शिरसाठ, आसाराम भगत या शेतकऱ्यांना पुरस्कार देण्यात आला.

कर्डिले म्हणाले, की जोपर्यंत माणूसगाव सोडून बाहेर जात नाही, तोपर्यंत अहंकार जाऊन ज्ञान येत नाही. जोपर्यंत प्रश्न पडत नाहीत, तोपर्यंत ज्ञान प्राप्त होत नाही. संत साहित्याने पोट भरत नाही, पण मनःशांती मिळते. तुकोबारायांची गाथा नीट हाताळली नाही, तर आपला माथा नीट होत नाही. सकारात्मक बदल करायला शिका. शाळा- महाविद्यालयांतून बाहेर पडणारा जगाला काही तरी देऊ शकतो. प्रास्ताविक राजभर टेमकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र इंगळे यांनी केले. आभार श्यामराव गरड यांनी मानले.

कासार पिंपळगाव : डॉ. तानाजी पाटील यांना पुरस्कार प्रदान करताना अशोक महाराज कर्डिले. समवेत राहुल राजळे, उद्धव वाघ,जे. आर. पवार, रामकिसन काकडे. (छायाचित्र : अजय गांधी)

लोकमत

दादापाटील राजळे सहकार पंढरीचे वारकरी होते

कर्डिले महाराज : राजळे स्मृती व्याख्यानमाला; शेतकऱ्यांसह, शिक्षक, विद्यार्थ्यांचा सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

तिसगाव : कर्मयोगी प्रयत्नवाद हाच गुरू मानतात. अल्पशिक्षित असले तरी शिकावेसे वाटणे ही त्यांची सातत्याची धारणा असते. पाथर्डीत दुष्काळ पाचवीला पूजलेला. मात्र, दादापाटील राजळे यांनी सहकाराची बिजे रुजवून शैक्षणिक सुबत्ता निर्माण केली. दादापाटील राजळे सहकार पंढरीचे आता प्रयत्नवादच खऱ्या अर्थाने तारणहार ठरणार आहे. अल्पशिक्षित असले तरी दादापाटील राजळे हाच जीवनक्रम जगले, असेही कर्डिले महाराजांनी सांगितले.

सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता शिवाजी राजळे यांनी वडिलांच्या पत्रांच्या प्रदर्शनाचा मागोवा घेत स्मृतींना उजाळा दिला. अध्यक्षीय

भूमी

सहकारमहर्षी स्व.दादापाटील राजळे यांच्या १०० वी जयंतीनिमित्त व्याख्यानमाला

पुण्य नगरी

यशस्वी जीवन जगण्यासाठी नियोजन महत्वाचे: शितोळे

कासार पिंपळगाव : करिअरचे ध्येय निश्चित करून नियोजनपूर्वक ते पूर्ण केले पाहिजे. जीवनात यशस्वी होण्यासाठी योग्य नियोजन असणे गरजेचे आहे. त्यामुळे नैराश्य येणार नाही. तसेच पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्यपर आधारित शिक्षण घेणे काळाची गरज आहे. प्रत्येकाने आपला स्वतःशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे मत यशवंत शितोळे (संस्थापक,अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र, कोल्हापूर) यांनी व्यक्त केले.

पाथर्डी तालुक्यातील आदिनाथनगर येथील दादापाटील राजळे महाविद्यालयात स्व. दादापाटील राजळे यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानमालेत पुष्प गुंफताना 'करिअर कट्टा' यशस्वी जीवनाचा मंत्र' या विषयावर ते बोलत होते. या वेळी शितोळे यांनी युवकांना त्यांच्या करिअर संबंधित मार्गदर्शन केले. करिअरचे ध्येय निश्चित करून नियोजनपूर्वक ते पूर्ण केले पाहिजे. जीवनात यशस्वी होण्यासाठी योग्य नियोजन असणे गरजेचे आहे. त्यामुळे नैराश्य येणार नाही. तसेच पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्यपर आधारित शिक्षण घेणे काळाची गरज आहे. प्रत्येकाने आपला स्वतःशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

शिक्षण संस्थेचे विश्वस्त राहुल राजळे यांनी स्व. दादापाटील राजळे यांच्या कार्याचा आलेख व शिक्षणाविषयी विचार मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जेष्ठ संचालक उद्धवराव वाघ यांनी भुषवले. त्यांनी स्व. दादापाटील राजळे यांच्या स्मृतींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.किशोर गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. आसाराम देसाई यांनी मानले. यावेळी शिक्षणसंस्थेचे उपाध्यक्ष रामकिसन काकडे, भास्करराव गोरे ,सचिव आर.जे.महाजन, प्राचार्य डॉ. राजभर टेमकर, कृषी विद्यालयाचे प्राचार्य डॉ.युवराज सूर्यवंशी, श्री आनंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेषराव पवार, आबासाहेब काकडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मच्छिंद्र फसले, बन्सीभाऊ लवांडे, पोपटराव आंधळे, सुनील पुंड, रामदास मारके आदी मान्यवर, नागरिक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Smart Ahmednagar
Page No.4 August 22, 2022

शिक्षणाबरोबर कौशल्य आधारित शिक्षण घेणे काळाची गरज - यशवंत शितोळे

स्व. दादापाटील राजळे जयंती निमित्त स्मृती व्याख्यानमा आयोजन

जळ भूमी प्रतिनिधी सावेडी पाथर्डी प्रतिनिधी ता. पाथर्डी

स्व. दादापाटील राजळे यांच्या १०० व्या जयंती निमित आयोजित स्मृती व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प श्री यशवंत शितोळे (संस्थापक,अध्यक्ष) महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, कोल्हापूर, यांच्या ''करिअर कट्टा- यशस्वी जीवनाचा मंत्र'' या विषयावरील व्याख्यानाने गुंफण्यात आले.



दादापाटील राजळे महाविद्यालय आदिनाथनगर येथे आयोजित व्याख्यानमालेत यशवंत शितोळे यांनी युवकांना त्यांच्या करिअर संबंधित मार्गदर्शन केले. करिअरचे ध्येय निश्चित करून नियोजन पूर्वक ते पूर्ण केले पाहिजे. जीवनात यशस्वी होण्यासाठी योग्य नियोजन असणे गरजेचे आहे, त्यामुळे नैराश्य येणार नाही. तसेच पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्यावर आधारित शिक्षण घेणे काळाची गरज आहे. प्रत्येकाने आपला स्वतःशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

शिक्षण संस्थेचे विश्वस्त राहुल राजळे यांनी स्व. दादापाटील राजळे यांच्या कार्याचा आलेख व शिक्षणाविषयी विचार मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जेष्ठ संचालक उद्धवराव वाघ यांनी भुषवले. त्यांनी स्व. दादापाटील राजळे यांच्या स्मृतींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.किशोर गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. आसाराम देसाई यांनी मानले. यावेळी शिक्षणसंस्थेचे उपाध्यक्ष रामकिसन काकडे, भास्करराव गोरे ,सचिव आर.जे.महाजन, प्राचार्य डॉ. राजभर टेमकर, कृषी विद्यालयाचे प्राचार्य डॉ.युवराज सूर्यवंशी, श्री आनंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेषराव पवार, आबासाहेब काकडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मच्छिंद्र फसले, बन्सीभाऊ लवांडे, पोपटराव आंधळे, पुरुषोत्तम आठरे, धनंजय बडे, विक्रम शिंदारी राजळे, सचिव जे.आर.पवार, प्रगती कार्यकारी संचालक आर.जे.महाजन, किशोर मारकड, दशरथ खोसे, आसाराम जेपे, मिलिंद म्हस्के आदी प्रमुख व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.राजभर टेमकर, सूत्रसंचालन प्रा.राजेंद्र इंगळे यांनी केले तर आभार प्रा.शामराव गरड यांनी मानले.

दै.सार्वमत.

स्व. दादापाटील राजळे यांनी इतिहास घडवला

अशोक महाराज कर्डिले : स्व. राजळे व्याख्यान मालेचा समारोप

पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)- ज्या मागतांकडे जिद असते तीच मागतं काही पण प्राप्त करू शकतात. स्व.दादापाटील राजळे यांचेकडे जिद होती म्हणूनच त्यांनी माळूर कारखाना काढून सहकार क्षेत्रात,शिक्षण संस्था सुरू करून शिक्षण क्षेत्रात तर पाथर्डी सारख्या दुष्काळी तालुक्यात बांधोरी चारीचे पाणी आणून शेतीमध्ये क्रांती करून इतिहास घडविला, असे प्रतिपादन चिचोडी पाटील येथील प्रसिद्ध भागवताचार्य अशोक महाराज कर्डिले यांनी केले.

तालुक्यातील दादापाटील राजळे महाविद्यालयाच्यावतीने भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व सहकारमहर्षी स्व.दादा पाटील राजळे यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त आयोजित तीन दिवसीय स्व.दादापाटील राजळे स्मृती व्याख्यानमालेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. याचेळी मान्यवरांच्या हस्ते सहकारमहर्षी स्व.दादापाटील राजळे राज्यस्तरीय उत्कृष्ट संत साहित्य पुरस्कार पुणे येथील प्रा.डॉ.तानाजी पाटील यांना संत साहित्यातील सामाजिकता या ग्रंथासाठी प्रदान करण्यात आला. तसेच स्व.सौ. चंद्रभागाबाई दादापाटील राजळे सेवाभावी संस्थेच्यावतीने तालुक्यातील गुणवंत शेतकरी व गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सन्मान याचेळी करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जि.प.सदस्य राहुल राजळे होते.

कर्डिले महाराज म्हणाले, स्व.दादापाटील राजळे यांचा जन्म सुष्ठा चांगल्या कामासाठी झाला होता. त्यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरचा काळही अनुभवला आहे.अध्यात्म व परमार्थ पण त्यांनी केला. त्यांच्याकडे दृष्टाही होती.काळाबरोबर ते बदलत होते. अल्पशिक्षीत असूनही ते इंग्लड सारख्या देशात फिरून आले. तेथील विकास आपल्याकडे राबवण्याचा प्रयत्न केला. जोपर्यंत गाव सोडून बाहेर जात नाही तोपर्यंत अहंकार जात नाही व ज्ञान येत नाही. शिक्षण म्हणजे फक्त कागदाचीही डिग्री नको.जीवनात सकारात्मक बदल करायला शिका. देवाच्या मंदिरात वेगळा एखादा भक्त दाखिक असू शकतो पण शाळा महाविद्यालयाच्या मंदिरातून बाहेर पडणारा जगाला काहीतरी देऊ शकतो. असे सांगत शुभकार्यात विविध प्रकारची देणगी अलंकार, वस्त्रे, भांडी, देण्यापेक्षा पुस्तके भेट द्या,असे आवाहनही त्यांनी उपस्थितांना केले.

याचेळी विक्रम शिवाजी राजळे,राहुल राजळे,प्रा.डॉ.तानाजी पाटील, प्रा.डॉ. एकनाथ खांदवे यांनी मनोगत व्यक्त केले.यामंगी वृध्देश्वरचे उपाध्यक्ष रामकिसन काकडे, ज्येष्ठ संचालक उध्दवराव वाघ, सुभाष ताठे, कुशिनाथ बर्डे, श्रीकांत मिसाळ, बाबासाहेब किलबिले, नारायण काकडे, शरद अकोलकर, शेषराव ढाकणे, श्यामसुंदर राजळे, पोपटराव आंधळे, पुरुषोत्तम आठरे, धनंजय बडे, विक्रम शिंदारी राजळे, सचिव जे.आर.पवार, प्रगती कार्यकारी संचालक आर.जे.महाजन, किशोर मारकड, दशरथ खोसे, आसाराम जेपे, मिलिंद म्हस्के आदी प्रमुख व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.राजभर टेमकर, सूत्रसंचालन प्रा.राजेंद्र इंगळे यांनी केले तर आभार प्रा.शामराव यांनी मानले.

पुरस्कारार्थी असे

- सहकारमहर्षी स्व. दादापाटील राजळे प्रतिष्ठीत ऊस उत्पादक शेतकरी पुरस्कार भिवसेन गोपिनाथ हाडके(सांगवी),आजिनाथ शिरसा शिरसाठ(पिंपळगाव टप्पा),आसाराम महाराम भगत (कासार पिंपळगाव)यांना देण्यात आला. सहकारमहर्षी स्व.दादापाटील राजळे प्रतिष्ठीत दूध उत्पादक शेतकरी पुरस्कार विष्णू बाबूराव चितळे (डवलेवाडी), अशोक राधाकिसन माने (डवलेवाडी), आप्पु शंकर माने (निवडुंढे), राजेंद्र किसन भडके (तिसगाव) यांना देण्यात आला. तर सहकारमहर्षी स्व.दादापाटील राजळे प्रतिष्ठीत फळे उत्पादक शेतकरी पुरस्कार शशीकांत भरत शिंदे (भोसे), गणेश पोपट घोगे (घाटशिरस), महादेव यशवंत राजळे (कासार पिंपळगाव)यांना देण्यात आला.

वर्तमानपत्रातील प्रसिद्धी

पुढारी

कमीपणाची भावना दुःखास कारणीभूत

डॉ. संज्योत वैद्य; स्व.दादा पाटील राजळे स्मृती व्याख्यानमाला

पाथर्डी तालुका : पुढारी वृत्तसेवा

अपूरेपणामुळे आपण आपला आनंद कमी करतो. रोज वेगवेगळ्या भूमिका निभवताना कमीपणाची भावना तयार होऊन हीच भावना दुःखास कारणीभूत ठरते. आत्म्याचा परिस्थितीवरचा आपल्या विचारावर होणारा परिणाम दुःखास कारणीभूत आहे. आनंदाचा विरजण पहले, मानूस मयाची मशगत महत्वाची आहे. असे प्रतिपादन संगमेर येथील स्टुडिंग इंटरनॅशनल स्कूलच्या संचालिका प्राचार्या डॉ.संज्योत वैद्य यांनी केले.

तालुक्यातील आदिनाथनगर येथील दादा पाटील राजळे महाविद्यालयात स्व. दादा पाटील राजळे जयंतीनिमित्त आयोजित स्मृती व्याख्यानमालेत डॉ. वैद्य यांनी आनंदाचे डोही आनंद तरंग या विषयावर पहिले पुष्प गुंफले.

वावोळी आमदार मोनिका राजळे, रामकिसन काकडे, सुभाष ताठे, सुभाष बडे, शेषराव कचरे, कुशीनाथ बडे, बाबासाहेब किलबिले, नारायण काकडे, साहेबराव सातपुते, विक्रमराव राजळे, जे. आर. पवार, आर. जे. महाजन, भास्कर गोरे, शामू राजळे, आर. वाय. महस्के, शामराव गरड, दत्तात्रय भगत, प्राचार्य डॉ.राजेश टेमकर उपस्थित होते.

वैद्य म्हणाल्या, अहंभाव बाजूला ठेवून दुसऱ्याचे कौतुक केले पाहिजे. म्हणजे होती आनंदी होती आणि आनपणही आनंदी राहतो. मनुष्य जीवनात आपण कितीही भौतिक सुविधा मिळविण्यासाठी पळत असाल, तर त्याचावर आत्मिक समाधानसाठी जीवन परिपूर्णपणे जागून घेण्याची गरज आहे. आमदार राजळे म्हणाल्या, प्रत्येकाने आपल्या आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवावी. सोशल मीडियावरील नकारात्मक गोष्टींकडे लक्ष न देता सकारात्मक गोष्टी अंगीकारल्यास. प्रास्ताविक डॉ.साधना म्हस्के, सूत्रसंचालन डॉ. निर्मला काकडे यांनी, तर आभार प्रा. योगिता इंगळे यांनी केले.

Ahmednagar Edition
Aug 21, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

सार्वमत

स्व. दादापाटील राजळे स्मृती व्याख्यानमालेस प्रारंभ

पाथर्डी (तालुका प्रतिनिधी) - सहकारमहर्षी स्व. दादापाटील राजळे यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त दादापाटील राजळे महाविद्यालय तीन दिवसीय स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये स्मृती व्याख्यान मालेच्या पहिल्या दिवशी डॉ.संज्योत वैद्य यांनी आनंदाचे डोही आनंद तरंग या विषयावर व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफले.

डॉ. संज्योत वैद्य यांनी गुंफले पहिले पुष्प

वावोळी आमदार मोनिका राजळे, वृद्धेश्वरचे उपाध्यक्ष रामकिसन काकडे, सुभाषराव ताठे,बाजार समितीचे सभापती सुभाष बडे, कुशीनाथ बडे, बाबासाहेब किलबिले, नारायण काकडे, साहेबराव सातपुते, विक्रम राजळे, वृद्धेश्वरचे कार्यकारी संचालक आर.जे.महाजन, माजी कार्यकारी संचालक जे.आर. पवार साहेब, भास्कर गोरे, शेषराव कचरे, शामराव गरड, दत्तात्रय भगत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजपर टेमकर, अशोक काळे, सुनील पानखडे, दादा मरकड व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.सोमवारी (दि.२१) यशस्वी जीवनासाठी आवश्यक दृष्टी या विषयावर डॉ. यश वेलणकर, मुंबई यांचे तर मंगळवारी (दि.२२) मुख्य जयंती सोहळा उत्सव व गुणवंत विद्यार्थी, शिक्षकांचा सत्कार, आणि प्राचार्य डॉ.अरूण अडसूळ यांचे करिअरच्या वाटा निवडताना या विषयावर व्याख्यान होणार आहे. व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी करण्यात आले

Sarwamat Edition
Aug 21, 2023 Page No. 9
Powered by : eReleGo.com

स्वप्नपूर्तीसाठी मेहनत आवश्यक : वेलणकर

पाथर्डी, दि. २१ (प्रतिनिधी) - तुम्ही कोणते स्वप्न पाहता व त्याच्या पूर्तीसाठी तुम्ही किती मेहनत घेता यावर यश अवलंबून असते. डिप्रेशन, भीती, चिंता या वेळीच ओळखता आल्या पाहिजेत. त्यातून बाहेर पडण्यासाठी मेंदूचे काही व्यायाम करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सायको थेरपीस्ट व माइंड फिलनेसचे कोच डॉ. यश वेलणकर (मुंबई) यांनी केले.

स्व. दादा पाटील राजळे यांच्या १०१व्या जयंतीनिमित्त दादा पाटील राजळे

राजळे स्मृती व्याख्यानमाला

महाविद्यालयात आयोजित १८व्या स्मृती व्याख्यानमालेत दुसरे पुष्प गुंफताना हे बोलत होते. या वेळी या वेळी सरपंच मोनाली राजळे, प्राचार्य डॉ. राजधर टेमकर, डॉ. विनायक हडके, संचालक चारुदत्त वाघ, जे. आर. पवार, भास्कर गोरे, आर. जे. महाजन, शामूनाना राजळे, दत्तात्रय देशमुख, साखरे, केरबापू शेळके, बाबा शेख, सचिन नेहूल, वसंत नेहूल, सुखदेव म्हस्के, सुनील पुंड, राधाकिसन राजळे, विक्रम राजळे, अशोक काळे, सुनील पानखडे, आदी उपस्थित होते.

